# अजब न्याय

महाराष्ट्र राज्यातील सर्व सहकारी संस्थांवर महाराष्ट्र शासनाच्या वतीने नियंत्रण हे मा. सहकार आयुक्त कायद्याने करीत असतात. पैकी बँकांवर तिहेरी नियंत्रण आहे. मा. सहकार आयुक्त, भारतीय रिझर्व्ह बॅंक व नाबार्ड करीत असते. तसेच राज्यातील सहकारी साखर कारखान्यांवर मा. साखर आयुक्त हे नियंत्रण करित असतात. मात्र या सर्व सहकारी संस्थांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व सहकारी संस्था नियम १९६१ लागू आहे. त्यामुळे कोणीही कोणावरही नियंत्रण करीत असले तरी कायद्याच्या बाहेर जावून नियंत्रण कोणालाही करता येत नाही. भारताच्या संविधानाने अशाप्रकारचे अधिकार कोणालाही दिले नाहीत.

जेष्ठ समाजसेवक व माजी स्वातंत्र्य सैनिक आदरणिय अण्णासाहेब हजारे यांनी राज्यातील पतसंस्था, बँका व साखर कारखाने यामध्ये असलेल्या अनैतिक व गैरव्यवस्थापनाच्या विरोधात सातत्याने आवाज उठविला आहे. परिणामी तात्पुरती डागडुजी व वरवरची कारवाई साखर कारखान्यांवर मा. साखर आयुक्तांनी केल्याचे दिसते परंतु पतसंस्था व बॅंका यांचे बाबतीत मात्र मा. सहकार आयुक्त हे शासनाच्या निर्देशावरुन अत्यंत अमानुषपणे, निर्दयपणे कायदा हातात घेऊन वागताना वारंवार दिसते. पतसंस्था व बँकानी सभासदांच्या मंजूर कर्जामधून आवश्यक भाग रकमेशिवाय कुठलीही रक्कम कापण्यावर यापुर्वीच बंदी आणलेली आहे. एवढेच नव्हे तर याचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर थेट कारवाई करण्याचे परिपत्रक काढून शासन मोकळे झालेले आहे.

राज्यातील ४५० च्या दरम्यान पतसंस्था व काही बँका यांचेवर तर शासनाने इंग्रजांना लाजवेल अशी घातकी वृत्ती केलेली आहे. ठेविदारांचे पैसे वेळेवर न दिल्यामुळे पतसंस्था व बँकांच्या संचालकांवर कलम ७८, ८३ व ८८ द्वारे कारवाई करून आय. पी. सी. खाली फौजदारी गुन्हे दाखल करून हजारो कार्यकर्त्यांना जेलमध्ये डांबण्याचे मोठ्या तथाकथीत बहादुरकीचे काम करून सरळ सरळ मस्तवालपणाची भूमिका पार पाडलेली आहे. २० हजार पतसंस्थांमध्ये ३५ हजार कोटीच्या वर सर्व सामान्य जनतेच्या ठेवी आहेत आणि त्यामधिल केवळ ४५० पतसंस्थांमध्ये ५०० कोटी रूपयांच्या ठेवी परत करण्याची समस्या आहे. त्या पतसंस्थांमधील वस्तुस्थिती व परिस्थिती न पडताळता केवळ ह्या ठेवी परत केल्या नाहीत, या कारणास्तव आय. पी. सी. खाली फोजदारी गुन्हे दाखल करून सरकार नामानिराळे झाले आहे.

काही पतसंस्थांमध्ये १ लाख रूपयांच्या आतिल रकमेच्या ठेवी केवळ दिल्या नाहीत म्हणुन संचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल केलेल आहेत. त्यांचेवर विविध कलमाखाली कारवाई चालू आहेत. आणि उलटपक्षी राज्यात एकूण सर्व १७५ साखर कारखान्यांमध्ये ९० टक्के पेक्षा जास्त साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून त्यांची वैयक्तिक लेखी संमत्ती न घेता करोडो रूपयांच्या कपाती ठेवी, निधी, देणगी माध्यमातून केलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर या साखर कारखान्यांनी मुदत संपलेल्या ठेवीच्या रकमा व त्यावरील व्याजही गेली ५ ते २५ वर्षापर्यंत अद्यावत त्या - त्या वेळेला दिलेल्या नाहीत. ह्या साखर कारखान्यांच्या शासकीय लेखापरिक्षण अहवालात या ठेवी त्यावरील व्याज व इतर कपातीबद्दल गेली २५ वर्षापासून आक्षेप घेतलेले आहेत. व रकमा ताबडतोब अदा करण्याचे भाष्य सुध्दा केलेले आहेत. आणि ह्या सर्व रकमांची किमान १५० साखर कारखान्यांचा आकडा हा १५ हजार कोटी रूपयांच्या दरम्यान आहे. शासकीय लेखापरिक्षकाने लेखापरिक्षण

अहवालात ठेवी व त्यावरील व्याज सभासद शेतकऱ्यांना परत न दिल्याबद्दल स्पष्ट शेरे लिहून देखील मा. साखर आयुक्त व शासन यांनी या साखर कारखान्यांच्या एकाही संचालकावर आय. पी. सी. खाली गुन्हे दाखल करून त्यांना जेलमध्ये टाकले नाही. एवढेच नव्हे तर या साखर कारखान्यावर या कारणास्तव कलम ७८, ८३ व ८८ खाली कारवाई केली नाही. आणि हाच अजब न्याय आहे.

पुणे जिल्ह्यातील एक सहकारी साखर कारखान्याचा सन २००७ - ०८ सालचे शासकीय लेखापरिक्षण झालेले आहे. त्या शासकीय लेखापरिणात पान क्र. २६ वर मुद्दा क्र. ३ - **ठेवी** वर शासकिय लेखापरिक्षण अहवालात भाष्य केलेले आहे. ते खालीलप्रमाणे :-

कारखान्याकडे दिनांक ३१/०३/२००८ अखेरच्या आर्थिक पत्रकाप्रमाणे सभासद व बिगर सभासदांच्या, परतीच्या, बिनपरतीच्या, ऐच्छिक व पुर्व हंगामी इत्यादी अशा एकूण जमा असणाऱ्या ठेवीं पैकी रू. ७२६३९१५४.०० रकमेच्या ठैवी परतफेडीस पात्र व थकीत झालेल्या आहेत. तसेच सदर ठेवीवरील दिनांक १/४/२००४ ते ३१/३/२००८ अखेर या कालावधीतिल व्याज रू. ३९१७७६४६.०० थकीत व देय झालेले आहे. सदर परतफेडीस पात्र झालेल्या ठेवी व त्यावरील व्याज संबंधितांना सत्वर अदा करावे. ठेवीच्या प्रमाणात बँक खात्यात तरलता ठेवणे आवश्यक आहे. तथापि कारखान्याने दि. १९/११/२००८ चे पत्रान्वये रू. ४५९६५३३१/- इतक्या रकमेच्या ठेवींसाठी मा. साखर आयुक्त, म. रा. पुणे यांचेकडे २ वर्षे मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. सदर बाबत पाठपुरावा करावा.

वरील एका कारखान्याच्या ठेवी व त्यावरील व्याज मुदत संपुण देखील ही रक्कम १० कोटी रूपयांच्या पुढे आणि ही रक्कम वर्षानुवर्षे या कारखान्याने सभासद शेतकऱ्यांना दिलेली नाही. शेतकऱ्याने ठेवीच्या रकमांची मुदत वाढीसाठी केव्हाही त्या साखर कारखान्याला पत्र दिलेले नाही. संचालक मंडळ व वार्षिक सभेच्या ठरावाने ठेवी व त्यावरील व्याज वेळेत परत करता येत नाही म्हणून परस्पर ठराव रूपाने मुदत वाढ देऊन ठेवी व त्यावरील व्याज न देणे हाच या देशातला एवढा मोठा फौजदारी गुन्हा मात्र मा. साखर आयुक्त व राज्य सरकारने दुर्लक्षिला आहे.

म्हणून हा अजब न्याय आहे. भारताचे संविधान क कायद्याचा वापर व अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात वेगवेगळ्या पध्दतीने वापरतात व पतसंस्थांमध्ये काम करणाऱ्या छोट्या कार्यकर्त्यांवर त्यांचे आयुष्य उध्वस्त करण्याची भुमिका आयुक्तांच्या सरकारच्या माध्यमातून केली जाते. ही बाब अत्यंत संतापजनक व लोकशाहीचा खुले आम मुडदा पाडल्याचे उदाहरण आहे व राज्यात अशी या सेकडो साखर कारखान्यांची हीच परिस्थिती कमी जास्त प्रमाणात आहे. आयुक्त, सरकार व लोकप्रतिनिधी यांनी वेळीच या प्रकरणी लक्ष घालुन पतसंस्थांना पॅकेज देऊन व संबंधीत साखर कारखान्यांच्या संचालकांवर कलम ७८,८३ व ८८ खाली कारवाई करून आय. पी. सी. खाली फौजदारी गुन्हे दाखल करून ताबडतोब विनाविलंब जेलमध्ये डांबण्याचे पाऊल उचलले पाहिजे आणि थोर समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांनी ते स्वतः राहत असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील १० किलोमीटरच्या अंतरावरील साखर कारखान्याने ह्याच प्रकारचे झालेले करोडो रूपयांचे गैरव्यवहार व बँकाचे जवळजवळ डुबीत आलेले शेकडो करोडो रूपयांसाठी मा. साखर आयुक्त व राज्य सरकार यांना जाब विचारून सर्व सामान्य शेतकरी व जनतेला न्याय दिला पाहिजे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!